**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.११

सभावृत्तांत

दिनांक ०५/०१/२०१७ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१७ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०१/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे | सदस्य |
| ३. | मा. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, डॉ. सतीश गोरे, पशुवैद्यकीय अधिकारी, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. अशोक बोनगीर, लेखाधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. सुनिल पाटील, मा. एल. बी. जाधव, मा. शिरीष पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.मोहिते एस.एस., उपअभियंता, जलनि:सारण, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा.अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. ए.ए. मोमीन, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. निलेश दाते, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. वाकोडे ए.एस., मा. मुलाणी बी.एम., मा. रोकडे जे.बी., मा. इदे ए.के., कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. राजेंद्र जगताप, मा. ए.जी. दाढे, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. व्ही.ए. पाडवी, मा. भालेराव यु.ए., मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. कुंभार सी.एम. कनिष्ठ अभियंता, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग,मा. आनंद एस. नायडू, कनिष्ठ अभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. आर.एम. सौदाई, मा. अतुल सोनवणे, मा. धनश्री भत्ते, मा. शशिकांत मोरे, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक,मा.सुनिल दुदुसकर, मा.गोपाळ खैरे, उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव : दिनांक ५/१/२०१७ रोजीची नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. राजेंद्र गणपतराव जगताप: दिनांक ५/१/२०१७ रोजीची नियमित ड प्रभाग समिती गणसंख्येअभावी तहकुब करुन १५ मिनिटांनी सभेचे कामकाज सुरु करावे अशी सूचना मांडतो.

मा. रामदास बोकड - सदर सूचनेस मी अनुमोदन देतो.

मा. सभापती : दिनांक ५/१/२०१७ रोजीची ड प्रभाग समिती नियमित मासिक सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करुन दुपारी १२.१५ वा. घेणेत यावी.

------------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा** : दिनांक ५/१/२०१७ रोजीची दुपारी १२.१५ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी १२.१५ वा. सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. राजेंद्र गणपतराव जगताप: दिनांक ५/१/२०१७ रोजीची दुपारी १२.१५ वा. ची तहकुब ड प्रभाग समिती गणसंख्येअभावी तहकुब करुन १० मिनिटांनी सभेचे कामकाज सुरु करावे अशी सूचना मांडतो.

मा. रामदास बोकड - सदर सूचनेस मी अनुमोदन देतो.

मा. सभापती : दिनांक ५/१/२०१७ रोजीची ड प्रभाग समिती तहकुब मासिक सभा १० मिनिटांसाठी तहकुब करुन दुपारी १२.२५ वा. घेणेत यावी.

------------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा** : दिनांक ५/१/२०१७ रोजीची दुपारी १२.२५ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी १२.२५ वा. सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती**: दिनांक ५/१/२०१७ रोजीचे प्रभाग समिती सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात यावी.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सभेत सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. १ : प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव प्राथमिक ५४/१ मुलांच्या शाळेस कै. गणपतराव मारुती जगताप पाटील पिंपळे गुरव प्राथमिक शाळा ५४/१ मुलांची असे नाव देण्याबाबत

**विषय क्र. २ :** प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव प्राथमिक ५४/२ मुलींच्या शाळेस कै. अप्पासाहेब खंडूजी जगताप पाटील पिंपळे गुरव प्राथमिक शाळा ५४/२ मुलींची असे नाव देण्याबाबत

**विषय क्र. ३ :** प्रभाग क्र. ५७ येथे असणा-या पिंपळे गुरव स्मशानभूमीमध्ये सुसज्ज दशक्रिया विधी घाट तसेच विद्युत दाहिनी समाविष्ट करण्यात येणार आहे. सदर पिंपळे गुरव वैकुंठ स्मशानभूमी असे नाव देणेबाबत

**विषय क्र.** ४ : प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव आरक्षण क्रमांक ३४४ व ३४४ (अ) येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध खेळाचे मैदान विकसित करणार असुन सदर मैदानास कै. पांडुरंग खंडुजी जगताप पाटील खेळाचे मैदान असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र.** ५ : प्रभाग क्र. ५ पिंपळे सौदागर येथील स्मशानभूमीत तीन संडास ब्लॉक आहेत- (१) २० सीट्सचा एक ब्लॉक, (२)१६ सीट्सचा एक ब्लॉक व (३) ६ सीट्सचा एक ब्लॉक या तीन संडास ब्लॉक्सपैकी १६ सीट्सचा एक संडास ब्लॉक वापरता येत नसल्याने सदरचा संडास ब्लॉक पाडणेत यावा जेणेकरुन स्मशानभुमीमध्ये सदर जागेचा पार्कींग व इतर वापरासाठी उपयोग करता येईल. तरी सदरचा संडास ब्लॉक पाडणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे जानेवारी २०१७ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ माहे ऑक्टोबर २०१६, कार्यपत्रिका क्र. ९ माहे नोव्हेंबर २०१६ व कार्यपत्रिका क्र. १० डिसेंबर २०१६ च्या मासिक सभांचे सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ माहे ऑक्टोबर २०१६, कार्यपत्रिका क्र. ९ माहे नोव्हेंबर २०१६ व कार्यपत्रिका क्र. १० डिसेंबर २०१६ च्या मासिक सभांचे सभावृत्तांत कायम कायम करण्यात येत आहे.

**माहे जानेवारी २०१७ च्या कार्यपत्रिका क्र. ११ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.**

विषय क्र. १ ठराव क्र. ३४

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: आरोग्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/०७/कावि/६१६/२०१६ दि. ३१/१२/२०१६

केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी

टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे हा प्रभाग हगणदारी मुक्त करणेचे दृष्टीने मनपा शाळा व बचतगटाचे प्रमाणपत्र प्राप्त असुन आरोग्य विभागाचे कार्यवाहीनुसार सदर प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेबाबतच्या मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

विषय क्र. २ ठराव क्र. ३५

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: आरोग्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/०७/कावि/६१७/२०१६ दि. ३१/१२/२०१६

केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४३, ४४,४६,४७,४८,५४,५५,५६ व ५७ हे ९ प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषित करणेबाबतच्या प्रस्तावास मा. ड प्रभाग समितीने ठराव संमत झाला असुन याबाबत दै. चाहुल मध्ये दिनांक ४/१२/२०१६ रोजी व दै. संध्यानंद मध्ये दिनांक ६/१२/२०१६ रोजी जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु नागरीकांकडून एकही हरकत विहीत मुदतीत ड क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त न झालेली नाही. त्यामुळे उक्त प्रभाग क्र. ४३,४४,४६,४७,५४,५५ व ५७ हगणदारी मुक्त करणेबाबतचा विषय कायम करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ३ ठराव क्र. ३६

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे अनुमोदक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप

संदर्भ :मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे यांचा दिनांक २२/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ मधील कुणाल आयकॉन रोडवरील आरक्षण क्र. ३६७A पिंपळे सौदागर येथे क्रीडा मैदान आहे. सन १९९६ मध्ये विकास कामाचे आरक्षण पडले त्यावेळेस या क्रीडा मैदानासाठी स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर यांनी आपल्या मालकीची संपुर्ण जागा यासाठी दिली . ते एक उत्कृष्ट कबड्डी खेळाडू होते. अखिल भारतीय कबड्डी पंच होते व ते पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य देखील होते. त्यांनी आपले काळात अनेक नामवंत कबड्डी खेळाडू घडविले, कबड्डी खेळाला एक मानाचे स्थान मिळवून दिले. अशा सामाजिक, राजकीय, क्रीडा या विविध क्षेत्रामध्ये अमुल्य योगदान असणारे स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर यांच्या अविस्मरणीय कार्यासाठी प्रभाग क्र. ५५ मधील क्रीडा मैदानाला “अखिल भारतीय कबड्डी पंच स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर क्रीडांगण” असे नामकरण करण्याबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ०५/०१/२०१७ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. ४ ठराव क्र. ३७

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा.राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव प्राथमिक ५४/१ मुलांच्या शाळेस “कै. गणपतराव मारुती जगताप पाटील पिंपळे गुरव प्राथमिक शाळा ५४/१ मुलांची” असे नाव देण्याबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

विषय क्र. ५ ठराव क्र. ३८

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा.राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव प्राथमिक ५४/२ मुलींच्या शाळेस "कै. अप्पासाहेब खंडूजी जगताप पाटील पिंपळे गुरव प्राथमिक शाळा ५४/२ मुलींची" असे नाव देण्याबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ६ ठराव क्र. ३९

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा.राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ येथे असणा-या पिंपळे गुरव स्मशानभूमीमध्ये सुसज्ज दशक्रिया विधी घाट तसेच विद्युत दाहिनी समाविष्ट करण्यात येणार आहे. सदर स्मशानभूमीला "पिंपळे गुरव वैकुंठ स्मशानभूमी" असे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------------

विषय क्र. ७ ठराव क्र. ४०

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा.राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव आरक्षण क्रमांक ३४४ व ३४४ (अ) येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध खेळाचे मैदान विकसित करणार असुन सदर मैदानास "कै. पांडुरंग खंडुजी जगताप पाटील खेळाचे मैदान" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------------

विषय क्र. ८ ठराव क्र. ४१

दिनांक ०५/०१/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ :मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे यांचा दिनांक ०५/०१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५ पिंपळे सौदागर येथील स्मशानभूमीत तीन संडास ब्लॉक आहेत- (१) २० सीट्सचा एक ब्लॉक, (२)१६ सीट्सचा एक ब्लॉक व (३) ६ सीट्सचा एक ब्लॉक या तीन संडास ब्लॉक्सपैकी १६ सीट्सचा एक संडास ब्लॉक वापरता येत नसल्याने सदरचा संडास ब्लॉक पाडणेत यावा जेणेकरुन स्मशानभुमीमध्ये सदर जागेचा पार्कींग व इतर वापरासाठी उपयोग करता येईल. तरी सदरचा संडास ब्लॉक पाडणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्माननीय नगरसदस्य मा. रामदास गेणभाऊ बोकड व मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांनी सन २०१२ पासुन आतापर्यंतच्या कालावधीतील कामकाजास अनुसरुन सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे सहकार्याबाबत आभार मानले. तसेच मा. रामदास बोकड यांनी ड क्षेत्रीय कार्यालयाचे जलनि:सारण विभागाचे उपअभियंता पदी श्री. सुर्यकांत मोहिते यांची पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सभागृहाचे वतीने अभिनंदन केले.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे यांनी सर्व नगरसदस्यांचे व अधिकारी यांचे सभेस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले.

मा. सभापती : सर्व उपस्थित अधिकारी, उपस्थित सन्मा. नगरसदस्य व कर्मचारी वर्गाचे सभेस उपस्थित राहिल्याबाबत आभार मानुन माहे जानेवारी २०१७ ची ड प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,

रहाटणी - १७

सही/-

( सीताराम बहुरे )

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**

**(सभाशाखा)**

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/०५/२०१७

दिनांक –०५/०१/२०१७